*बेरारी शेळीने दिला व्यावसायिक आत्मविश्वास*

*शेळीपालन हा पूर्वीपासूनच पशुपालकांचा आवडीचा व्यवसाय आहे. शेळीच्या मटणाची वाढती मागणी व बाजारमुल्य आणि त्या तुलनेत शेळीपालनासाठी लागणारे किमान श्रम, कौशल्य व भांडवल या घटकांमुळे प्रगतीशिल शेतकरी, व्यापारी, बेरोजगार युवक तसेच ग्रामीण भागातील बहुतांश लोक व्यावसायीक शेळीपालनाकडे सहजपणे आकृष्ट होताना दिसतात. पशुपालनाच्या सुधारीत संकल्पनांमुळे ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी रोजगाराच्या नव्या वाटा उपलब्ध झाल्या आहेत.*

***श्री. महादेव तेहल्ले**, मु. वाशिंबा, ता. जि. अकोला यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथील स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेच्या पशुअनुवांशिकीशास्त्रा विभागामार्फत घेतल्या गेलेल्या शेळीपालनाविषयीच्या प्रशिक्षणाला जिज्ञासे पोटी हजेरी लावली. पशुअनुवांशिकी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या **"बेरारी जातीच्या शेळयांचे संगोपन तंत्राज्ञानाचे ग्रामस्थांना प्रात्याक्षीक व प्रशिक्षणाव्दारे अकोल्यातील दोन विभागाच्या पाच खेडयांमध्ये प्रसारण"** या जैवतंत्राज्ञान विभाग, नवी दिल्ली तर्फे पुरस्कृत प्रकल्पा अंतर्गत श्री. महादेव तेहल्ले यांनी शेळीपालनाविषयी प्रकल्प प्रमुख **डॉ. एस.व्ही.कुरळकर** यांचेकडून अधिकाधिक माहिती मिळवली. सदर प्रकाल्पांतर्गत श्री. तेहल्ले यांना दोन बेरारी शेळया व एक बोकड असे बेरारी शेळीचे युनिट प्राप्त झाले. श्री. तेहल्ले यांना शेळीपालनात पुर्वीपासूनच आवड होतीच व त्यांच्याजवळ तीन शेळया होत्या. मात्रा प्रकल्पांतर्गत मिळालेल्या बेरारी शेळयांच्या युनिटने त्यांना रोजगाराची नवी संधी उपलब्ध करून दिली. प्रकल्पांतर्गत वेळोवेळी होत असलेल्या प्रशिक्षणवर्ग तसेच आरोग्य शिबीरास श्री. तेहल्ले नियमीतपणे सहभाग नोंदवीत आणि नवनवीन माहिती जाणून घ्यायचा प्रयत्न करीत. तसेच आपणही आपल्या पातळीवर शास्त्रीय पद्धतीने शेळीपालन केल्यास आर्थिक फायदा मिळवू शकतो असा त्यांना आत्मविश्वास वाटू लागला.*

*जुळे पिल्ले देण्याच्या बेरारी शेळीच्या वैशिष्टयाने श्री. तेहल्ले यांच्या अंगणातील शेळयांची संख्या वाढू लागली. हळूहळू आवश्यक तेवढ्याच शेळया व बोकड ठेवून तेहल्लेंनी इतर शेळया जवळच्या बाजारात विक्रीस काढल्या. विदर्भातील उष्ण व कोरडया हवामानात अनुकुलरित्या तग धरण्याची कुवत बेरारी शेळीत निसर्गतः असल्याने मटणासाठी बेरारी शेळीला उत्तम बाजार मुल्य मिळू लागले. थेंबे थेंबे तळे साचे या उक्ती प्रमाणे शेळी विक्रीच्या मिळकतीतून श्री. तेहल्ले यांनी आपले एक छोटेसे किराणा दुकान उभे केले. सौ. तेहल्ले बाई हया दुकानावर बसून चरितार्थासाठी आपल्या पतीस साथ देत आहे. शेळी पालनातून इतर व्यवसाय उभा राहू शकतो हा आत्मविश्वास अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येतो. आजही त्यांच्याकडे 7 शेळया व 3 बोकड आहेत. किराणा दुकान टाकले तरी मात्रा शेळी पालनाची कांस त्यांनी सोडलेली नाही.*



*श्री. महादेव तेहल्ले शेळयांच्या कळपासोबत*



*श्री. महादेव तेहल्ले यांचे किराणा दुकान*

***बेरारी शेळयांचे पैदास बनले रोजगाराचे साधन***

*पशुपालन हा पुर्वापार चालत असलेला एक प्रमुख शेतीपुरक व्यवसाय आहे. पारंपारिक पशुपालनास शास्त्रोक्त ज्ञानाची जोड मिळाल्यास ते रोजगाराचे नवे साधन तर बनतेच पण त्याच बरोबर ग्रामीण भागातील बेरोजगारांना आपणही रोजीरोटीसाठी काहीतरी छोटेखानी व्यवसाय करून आर्थिक उन्नतीचे साधन बनते.*

*अकोला जिल्हयातील बाशिंबा या छोटयाशा खेडयातील **श्री. रामदास चव्हाण** यांची गोष्टही अशीच आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथील स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेच्या पशुअनुवांशिकीशास्त्रा विभागामार्फत घेतल्या गेलेल्या शेळीपालनाविषयीच्या प्रशिक्षणाला जिज्ञासेपोटी हजेरी लावली. पशुअनुवांशिकीशास्त्रा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या **"बेरारी जातीच्या शेळयांचे संगोपन तंत्राज्ञानाचे ग्रामस्थांना प्रात्याक्षीक व प्रशिक्षणाव्दारे अकोल्यातील दोन विभागाच्या पाच खेडयांमध्ये प्रसारण"** या जैवतंत्राज्ञान विभाग, नवी दिल्ली तर्फे पुरस्कृत प्रकल्पांतर्गत श्री. रामदास चव्हाण यांनी शेळी पालना विषयी प्रकल्प प्रमुख **डॉ. एस.व्ही. कुरळकर** यांचे कडून अधिकाधिक माहिती मिळवली. सदर प्रकाल्पांतर्गत श्री. चव्हाण यांना दोन बेरारी शेळया व एक बोकड असे युनिट प्राप्त झाले. बाजारातील वाढत्या मटणाच्या किमतींवरून बेरारी शेळयांची वाढत्या मागणीची कल्पना श्री. चव्हाण यांना होतीच. म्हणून त्यांनी प्रकल्प प्रमुख डॉ. एस.व्ही.कुरळकर यांचे कडून कमीतकमी खर्चात जास्त फायदेशिर असे शेळयांचे पैदास व्यवस्थापन कसे करता येईल याची माहिती मिळवली. श्री. चव्हाण यांना मिळालेल्या दोन शेळया व एक बोकड या बेरारी शेळी युनिटच्या माध्यमातून अधिक वजन व सशक्त करडांची पैदास सुरू केली.*

पैदासक्षम शेळयांची विशेष काळजी घेत शेळयांची कळपातील संख्या वाढू लागली. जन्माला आलेल्या करडांची योग्य प्रकारे आरोग्य व पोषणाची काळजी घेत बाजारात विक्रीक्षम वयापर्यंत जास्तीत जास्त शारिरीक वजन कसे मिळवता येईल याची काळजी घेतली. या त्यांच्या मेहनतीचा परिणाम म्हणजे अवघ्या दोन वर्षाच्या कालावधीत त्यांनी शेळया विकून तब्बल 44000/— रूपये नफा मिळविला. या उत्पन्नातून त्यांनी आपल्या घराची डागडूजी केली, किरकोळ बांधकाम केले. त्याचबरोबर आपल्या मुलांच्या शिक्षणाचा खर्चही भागविला. बेरारी शेळयांच्या योग्य पैदास व्यवस्थापनातून त्यांना सहजगत्या करता येवू शकणारा रोजगाराचा मार्ग मिळाला. आजरोजी त्यांचे कडे 12 शेळया व 1 बोकड असा कळप आहे. आपल्या सुधारीत जीवनमानाबद्दल याच कळपाकडे बोट दाखवत श्री. चव्हाण व त्यांचे कुटूंबीय समाधान व्यक्त करतात.



श्री. रामदास चव्हाण यांचा शेळयांचा कळप

*कुक्कूटपालन झाले एका  ग्रामीण महिलेच्या संसाराचा आधार*

*अकोला जवळ असलेल्या **सांगवी मोहाडी** या खेडयातील **श्रीमती छाया तेलगोटे** या 35 वर्षीय परित्यक्ता महिलेची ही यशोगाथा.  पतीने टाकून दिल्यावर तीन लहान अपत्यांची पालनपोषणची जबाबदारी छायाबाई सोसत होती. शेतात मोलमजूरीचे काम करीत घर चालवणाऱ्या आईकडे पाहून मोठया मुलीनेही आपली शाळा अर्धवट सोडून शेतकामाची वाट धरली.  कुठलाही दुसरा रोजगार नाही, पुरेसे भांडवल नाही आणि महागाईच्या बिकट दिवसात, घर कसे चालवावे या चिंतेत श्रीमती छाया तेलगोटे यांचे कुटूंब जगत होते. पोटापाण्याचा प्रश्न काही सुटत नव्हता.  कधी कधी अर्धपोटी रहावे लागत असे.*

*महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथील स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेच्या **पशुपोषनशास्त्रा** विभागा मार्फत आयोजित **पशुधन उत्पादनातून ग्रामीण महिलांची उपजिवीकेत सुधारणा** हा प्रकल्प **डॉ. आर.एन.ढोरे**,  हे राबवीत होते.  सदर प्रकल्प शेतीतील महिलांची भुमिका या विषयावर संशोधन संचालन, भुवनेश्वर, ओडीसा यांचे तर्फे पुरस्कृत होता.  या प्रकल्पांतर्गत श्रीमती तेलगोटे यांची करूणकहाणी  लक्षात घेता त्यांना **20 गिरीराज पक्षी** (दहा आठवडे वयाच्या कोंबडया) पाळण्यासाठी देण्यात आले.  सोबतच पुरक पशुपोषक औषधे इ. आणि कोंबडयांच्या घरगुती खाद्य निर्मीतीचे प्रशिक्षण देण्यात आले.  श्रीमती तेलगोटे प्रमाणे निवड झालेल्या इतर ग्रामीण महिलांना एक दिवसीय कुक्कुटपालन व घरगुती खाद्य निर्मीतीचे प्रशिक्षण देण्यात आले होते.  खेडयातील विषम परिस्थीती आणि कोंबडयांची कुत्र्या–मांजरांकडून शिकार होण्याचा धोका लक्षात घेता गिरीराज जातीच्या कोंबडयांची प्रकल्प प्रमुखांमार्फत निवड केली होती.  श्रीमती तेलगोटे यांनी मोठया उत्साहाने 20 कोंबडया घरी आणून त्यांची निवाऱ्याची व्यवस्था केली.  मात्रा दोन चार दिवसातच तिन कोंबडया कुत्रा–मांजरांनी पळवल्या.  तरी श्रीमती तेलगोटे यांनी नाउमेद न होता कसाशीने अंगणात चरणाऱ्या कोंबडयांवर मोठया होईपर्यंत लक्ष ठेवून शिकार होण्यापासून बचाव केला.  या कोंबडयांना दिवसाच्या वेळी चरण्यास सोडणे आणि रात्रीच्या वेळी पुरक खाद्य देणे असा नित्यकम सुरू ठेवला.  खुराडयातील कोंबडयांनी अंडी घालणे सुरू केल्यावर प्रत्येकी एक अंडे 7 रू. भावाने विकत दिवसाकाठी मजूरीचे काम करत 80–85 रूपये शिल्लक जमा होत होते.  सुमारे दोन किलो वजनाचे झाल्यावर कोंबडयांना सहाशे रूपयापर्यंतही भाव मिळाला.  कुक्कुटपालनातून होत असलेला फायदा लक्षात घेत. श्री. तेलगोटे यांनी कळपातील कोंबडयांची संख्या वाढवत नेली. सध्या त्यांचेकडे 30 कोंबडया आहेत व सरासरी दरमहा रू.1500/– उत्पन्न सहज मिळवत आहेत. भविष्यात जागेच्या उपलब्धतेनुसार कोंबडयांची संख्या वाढवून उत्पन्न वाढविण्याचा त्यांचा मानस आहे. वेळोवेळी प्रकल्पांतर्गत मिळणारे मार्गदर्शन व औषोधोपचार यांनी श्रीमती तेलगोटे बाईंना नवा आत्मविश्वास दिला. कुक्कुटपालनातून मिळणाऱ्या उत्पादनाने श्रीमती तेलगोटे यांच्या संसाराला बऱ्याच प्रमाणात आधार दिला आहे. त्यांचा वरखर्च पुर्णपणे कोंबडीपालनातून भागवित असल्याचे त्यांनी सांगितले. आपली कर्मकहाणी त्या इतरांना आत्मविश्वासाने सांगतात आणि त्यांनासुद्धा घरगूती कोंबडीपालनासाठी उदयुक्त करतात.*




*श्रीमती छाया तेलगोटे यांना कोंबडयांचे वाटप करताना*



*श्रीमती छाया तेलगोटे यांच्या कोंबडयांच्या कळपासोबत प्रकल्पप्रमुख डॉ. आर.एन.ढोरे*